


दैनिक
अचूक वेध, अचूक बातमी
# अक्षराज
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध
Email : newsaksharaj2021@gmail.com




वर्ष : ०६ | अंक : १७, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, सोमवार, दि.३१ ऑगस्ट २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

## जरांगेंकडून शिवसेनेचा कार्यक्रम उधळून लावण्याचा इशारा

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.३०, नागपूर :** मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वाखाली आंदोलन सुरू असताना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे मेळावे घेऊ नयेत, तसेच मेळावा उधळून लावण्याचा इशारा जरांगे पाटील यांनी दिला आहे. त्यांच्या या भूमिकेवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सरकारची भूमिका स्पष्ट केली आहे.





आंदोलनाच्या ठिकाणी सरकारचे प्रतिनिधी उपस्थित असून ते आंदोलकांशी चर्चा करणार आहेत. यापूर्वीही सरकारने विविध प्रश्नांवर मार्ग काढला असून पुढेही चर्चेतून मार्ग काढला जाईल, असे फडणवीस यांनी सांगितले.

मुख्यमंत्री म्हणाले, जे काही आंदोलन चालले आहे, त्या आंदोलनामध्ये चर्चा करण्याकरता सरकारचे प्रतिनिधी त्या ठिकाणी आहेत, ते चर्चा करणार आहेत, यापूर्वीही आपण प्रत्येक गोष्टीचा मार्ग काढला आहे, आणि पुढेही आपण मार्ग काढणार आहोत. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हेदेखील या प्रक्रियेमध्ये सुरवातीपासून अतिशय संवेदनशीलतेने काम करत आहेत, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले.

जरांगे पाटील यांनी जातपडताळणी समित्या रद्द करण्यासह विविध मागण्या केल्या आहेत. या मागण्यांवरही सरकार चर्चा करण्यास तयार असल्याचे मुख्यमंत्री यांनी स्पष्ट केले.

दरम्यान, नेपाळमध्ये अडकलेल्या महाराष्ट्रातील पर्यटक आणि नागरिकांच्या मदतीबाबतही फडणवीस यांनी प्रतिक्रिया दिली. आपले हे कर्तव्यच आहे की, आपले प्रवासी जिथे अडकले असतील त्यांना बाहेर काढणे. नवीन भारत तयार झाला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शिकवण दिली आहे की, कुठेही अडचणीत भारतीय असेल तर त्याला मदत पोहोचली पाहिजे. महाराष्ट्रातील जे लोक तिथे आहेत, त्यांना त्यांच्या ठिकाणी पोहोचविण्यासाठी मदत केली जात आहे, असे त्यांनी सांगितले.

दरम्यान, मुख्यमंत्री फडणवीस यांनी वनमंत्री गणेश नाईक यांच्यासोबत गोरेवाडा आंतरराष्ट्रीय प्राणी उद्यानाची पाहणी केली. त्यांनी सफारी केल्यानंतर वन विभागाची आढावा बैठक घेतली. गोरेवाडा प्रकल्प गेल्या २५ वर्षांपासून विकसित करण्यासाठी प्रयत्न सुरू असल्याचे फडणवीस यांनी सांगितले. इंडियन सफारीनंतर पुढील वर्षी आफ्रिकन सफारी सुरू करण्याचे नियोजन असल्याचे त्यांनी सांगितले. आफ्रिकन सफारी हे गोरेवाड्याचे मुख्य आकर्षण ठरणार असून 'बिग फाईव्ह' म्हणून ओळखले जाणारे प्राणी येथे पाहायला मिळतील, तसेच मानव वन्यजीव संघर्ष कमी करण्यासाठी एआयच्या माध्यमातून अर्ली वॉर्निंग सिस्टिम विकसित करण्यात येत असल्याचेही फडणवीस यांनी सांगितले. विविध प्राण्यांकडून मिळणारे संकेत आणि कॅमेरा ट्रॅपसह अन्य तंत्रज्ञानाचा एकत्रित वापर करून नागरिकांना वन्यप्राण्यांच्या धोक्यापासून सुरक्षित ठेवण्याचा प्रयत्न केला जात असल्याचे त्यांनी सांगितले.

## पनवेलमध्ये घरफोडीच्या घटनांमध्ये वाढ; नागरिकांमध्ये चिंतेचे वातावरण

**अक्षराज : अभिनव येलवे**



**दि.३०, पनवेल (नवी मुंबई) :** पनवेल शहरासह परिसरात चोरी व घरफोडीच्या घटनांची मालिका सुरू असल्याने नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. अलीकडील काळात पनवेल, कळंबोली, कामोठे, कारंजाडे, आणि पनवेल च्या इतर भागात चोरीच्या विविध घटना समोर आल्या असून, पोलिसांनी काही प्रकरणांचा छडा लावला असला तरी वाढत्या घटनांमुळे नागरिकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.

कळंबोली येथील सेक्टर १४ मधील एमईएस पब्लिक स्कूलमध्ये ११ ऑगस्टच्या मध्यरात्री चोरट्याने खिडकीचे ग्रील कापून कार्यालयात प्रवेश केला आणि तब्बल १ लाख ७६ हजार ७७० रुपयांची रोकड लंपास केली. या प्रकरणाचा तपास करताना कळंबोली पोलिसांनी ६५ वर्षीय सराईत चोरट्याला अटक करून चोरीची संपूर्ण रोकड आणि घरफोडीसाठी वापरण्यात येणारे साहित्य जप्त केले. तपासात आरोपीचा शाळा व महाविद्यालयांमधील चोरीशी संबंध असल्याचे समोर आले.

दरम्यान, पनवेल तालुका परिसरातील वावंजे येथे १४ ते १७ ऑगस्टदरम्यान एस.एस. इंजिनिअरिंग कंपनीच्या गोडाऊनमध्ये घरफोडी झाली. या घटनेत १८० स्टेनलेस स्टील मशीन पार्ट्स चोरीला गेले. त्यांची किंमत सुमारे ४ लाख ५० हजार रुपये होती. पोलिसांनी तपास करून तिघांना अटक केली असून, त्यांच्या चौकशीत तब्बल चार चोरीचे गुन्हे उघडकीस आले आहेत. पोलिसांनी एकूण १२ लाख २ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

विशेष म्हणजे, या घटनांमध्ये घरांबरोबरच शाळा, शैक्षणिक संस्था आणि व्यावसायिक आस्थापनांनाही चोरट्यांकडून लक्ष्य केले जात असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे रात्रीच्या वेळी पोलिसांची गस्त वाढविणे, संवेदनशील भागात सीसीटीव्ही यंत्रणा मजबूत करणे आणि नागरिकांनीही सुरक्षा उपाययोजना करण्याची गरज व्यक्त होत आहे.

पनवेल परिसरात वाढत्या नागरीकरणामुळे मोठ्या प्रमाणात लोकवस्ती वाढत असताना सुरक्षेच्या दृष्टीने पोलिस यंत्रणेवरही अतिरिक्त जबाबदारी आली आहे. नागरिकांच्या मालमत्तेच्या सुरक्षेसाठी नियमित रात्रीची गस्त, संशयास्पद हालचालींवर लक्ष आणि चोरीच्या घटनांमधील आरोपींचा तातडीने शोध घेणे आवश्यक आहे.

चोरीच्या घटनांना आळा घालण्यासाठी पोलिसांची गस्त वाढवावी आणि नागरिकांनीही आपल्या परिसरातील सुरक्षा व्यवस्था अधिक सक्षम करावी, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे.

## मंत्री सावकारे यांना पंढरपुरात अडवले; जरांगे पाटलांच्या उपोषणाची दखल घेण्याची मागणी

**अक्षराज : विकास सरवळे**

**दि.३०,पंढरपूर :** संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील यांच्या सुरू असलेल्या उपोषणाची महाराष्ट्र सरकारने तात्काळ दखल घेऊन मराठा समाजाच्या न्याय हक्काच्या मागण्या मान्य कराव्यात, या मागणीसाठी महाराष्ट्र राज्याचे मंत्री संजय सावकारे यांना पंढरपूर येथे अडवून मराठा समाजाच्या वतीने तीव्र भावना व्यक्त करण्यात आल्या.

मनोज जरांगे पाटील हे सातत्याने उपोषण करत असून त्यांच्या प्रकृतीवर त्याचा गंभीर परिणाम होण्याची शक्यता आहे. त्यामुळे सरकारने परिस्थितीचे गांभीर्य ओळखून विलंब न करता चर्चेतून मार्ग काढावा आणि मराठा समाजाच्या मागण्यांबाबत सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी मागणी यावेळी करण्यात आली.

मनोज जरांगे पाटील यांच्या जीविताला धोका निर्माण होईल, अशी परिस्थिती निर्माण होऊ देऊ नका. त्यांच्या उपोषणाची तात्काळ दखल घेऊन मराठा समाजाच्या न्याय हक्काच्या मागण्या मान्य करा, अशी भूमिका आंदोलकांनी मांडली.

मराठा समाजाच्या विविध मागण्यांसाठी मनोज जरांगे पाटील यांनी यापूर्वीही अनेक आंदोलने व उपोषणे केली आहेत. मात्र, मागण्यांवर ठोस निर्णय न झाल्याने पुन्हा उपोषणाची वेळ आली असल्याची भावना समाजातून व्यक्त करण्यात आली. सरकारने या प्रश्नाकडे केवळ आंदोलन म्हणून न पाहता मराठा समाजाच्या भावनांचा आणि मागण्यांचा गांभीर्याने विचार करावा, अशी मागणी करण्यात आली.

यावेळी आंदोलकांनी सरकारला स्पष्ट इशारा देताना सांगितले की, मनोज जरांगे पाटील यांच्या प्रकृतीकडे दुर्लक्ष करून त्यांच्या जीविताला कोणताही धोका निर्माण झाल्यास त्याचे तीव्र पडसाद महाराष्ट्रभर उमटतील. परिस्थिती हाताबाहेर गेल्यास उग्र आंदोलनाला सुरुवात होऊ शकते आणि त्याची



सर्वस्वी जबाबदारी महाराष्ट्र सरकारची असेल.

पंढरपूरमध्ये मंत्री संजय सावकारे यांना अडवून मराठा समाजाच्या प्रतिनिधींनी आपली भूमिका मांडल्याने काही काळ वातावरण गंभीर बनले होते. सरकारने मराठा समाजाच्या मागण्यांवर तातडीने निर्णय घेऊन मनोज जरांगे पाटील यांचे उपोषण सोडवण्यासाठी पुढाकार घ्यावा, अशी मागणी करण्यात आली.

मराठा समाजाच्या न्याय हक्काच्या मागण्यांकडे दुर्लक्ष केल्यास आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशारा यावेळी देण्यात आला. त्यामुळे आता राज्य सरकार या मागण्यांबाबत कोणती भूमिका घेते आणि मनोज जरांगे पाटील यांच्या उपोषणावर तोडगा काढण्यासाठी कोणती पावले उचलते, याकडे संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष लागले आहे.

## जनावरे चारण्यासाठी गेलेल्या २५ वर्षीय तरुणाचा वाघाच्या हल्ल्यात मृत्यू




**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.३०, चंद्रपूर :** चंद्रपूर जिल्हयातील मोहर्ली वनपरिक्षेत्रांतर्गत येणाऱ्या मोहर्ली-१ बीटमधील कक्ष क्रमांक १५४ मध्ये दि. २९ ऑगस्ट २०२६ रोजी दुपारी १:०० वाजताच्या सुमारास वाघाच्या हल्लयात एका युवकाचा मृत्यू झाल्याची अत्यंत दुर्दैवी घटना घडली आहे. विजय मधुकर मेश्राम (वय अंदाजे २५ वर्षे, रा. जुनोना) असे मृत पावलेल्या युवकाचे नाव असून, तो जंगलात गुरे चारण्यासाठी गेला असताना दबा धरून बसलेल्या वाघाने त्याच्यावर अचानक हल्ला केला आणि यात त्याचा जागीच मृत्यू झाला.

घटनेची माहिती मिळताच मोहर्लीचे वनपरिक्षेत्र अधिकारी संतोष थिपे, दुर्गापूर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक शेगावकर व त्यांचे पथक, मानद वन्यजीव रक्षक मुकेश भांदककर तसेच क्षेत्रीय वनकर्मचाऱ्यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. पोलीस पंचनामा आणि घटनास्थळाचा पंचनामा पूर्ण केल्यानंतर मृतकाचा मृतदेह शवविच्छेदनासाठी ग्रामीण रुग्णालय, भद्रावती येथे हलविण्यात आला.

वनविभागाकडून मृतकाची आई निरंजना मधुकर मेश्राम यांना तात्काळ ५० हजार रुपयांची आर्थिक मदत मौक्यावरच घटनास्थळी सुपूर्द करण्यात आली. सुरक्षेच्या दृष्टीकोनातून सदर परिसरात कॅमेरा ट्रॅप लावण्यात आले असून, जुनोना परिसरातील नागरिकांना आणि गावकऱ्यांना जंगलात जाताना सतर्क राहण्याचे आवाहन करत जनजागृती मोहीम राबविली जात आहे. या संपूर्ण घटनेचा पुढील तपास मोहर्लीचे वनपरिक्षेत्र अधिकारी संतोष थिपे यांच्या मार्गदर्शनात वनविभाग करत आहेत.

## अहिल्यानगर-बीड रेल्वे डेमूचा प्रवास आता अधिक सुसाट

### खा.बजरंग सोनवणे यांची माहिती; १ सप्टेंबरपासून मध्य रेल्वेचे नवे सुधारित वेळापत्रक लागू

**अक्षराज : शिवाजी औसेकर**

**दि.३०, बीड :** अहिल्यानगर ते बीड या महत्त्वाच्या मार्गावर धावणाऱ्या डेमू ट्रेनच्या वेगात लक्षणीय वाढ करण्याचा निर्णय रेल्वे प्रशासनाने घेतला असून, गाड्यांचे सुधारित वेळापत्रकही अधिकृतपणे अधिसूचित करण्यात आले आहे. या नव्या निर्णयामुळे दोन्ही शहरांमधील प्रवासाचा वेळ तब्बल १ तास ३५ मिनिटांनी कमी झाला असून, आता हा पूर्ण प्रवास अवघ्या ४ तासांत पार पडणार आहे. खा. बजरंग सोनवणे यांनी या संदर्भातील माहिती प्रसिद्धीस दिली आहे.

पुणे विभाग मध्य रेल्वेचे सुधारित वेळापत्रक १ सप्टेंबर २०२६ पासून सुरू होणाऱ्या सर्व प्रवासांसाठी लागू केले जाणार आहे. अहिल्यानगर आणि बीड या दोन शहरांदरम्यान प्रवाशांची सोय वाढवणे, तसेच त्यांना अधिक जलद आणि आरामदायी प्रवासाचा अनुभव देणे हा या वेगवाढीमागील मुख्य उद्देश आहे. गाड्यांचा वेग वाढल्यामुळे दैनंदिन नोकरदार, व्यावसायिक, विद्यार्थी आणि सामान्य प्रवाशांची मोठी वेळेची बचत होणार आहे.

सुधारित वेळापत्रकानुसार, गाडी क्रमांक ७१४४१ -अहिल्यानगर – बीड डेमू सेवा १ सप्टेंबरपासून अहिल्यानगर स्थानकावरून सकाळी ६:५५ ऐवजी ५० मिनिटे उशिरा, म्हणजेच सकाळी ७:४५ वाजता सुटेल. मात्र, वेगात वाढ केल्यामुळे ही गाडी बीड येथे पूर्वीच्या दुपारी १२:३० ऐवजी खूप आधी, म्हणजेच सकाळी ११:४५ वाजताच पोहोचेल. परतीच्या प्रवासात, गाडी क्रमांक ७१४४२ बीड – अहिल्यानगर डेमू सेवा बीड स्थानकावरून दुपारी १:०० ऐवजी एक तास आधी, म्हणजेच दुपारी १२:०० वाजता प्रस्थान करेल. ही गाडी अहिल्यानगर येथे जुन्या वेळेनुसार सायंकाळी ६:३० ऐवजी तब्बल अडीच तास आधी, म्हणजेच दुपारी ४:०० वाजता पोहोचेल.

**असे आहेत रेल्वेथांबा...**

या दोन्ही गाड्यांच्या प्रवासादरम्यान



अहिल्यानगर, नारायणदोहो, न्यू लोणी, सोलापूरवाडी, न्यू धानोरा, कडा, न्यू आष्टी, वेताळवाडी, हाटोला, अमळनेर भांड्याचे, जटनानदूर, विघनवाडी, रायमोहा, राजुरी आणि बीड या सर्व प्रमुख स्थानकांवर नेहमीप्रमाणे थांबे कायम राहणार आहेत.

**रेल्वे विभागाचे अवाहन...**

दरम्यान, मध्य रेल्वे प्रशासनाने प्रवाशांना आवाहन केले आहे की, त्यांनी या नव्या आणि सुधारित वेळापत्रकाची गांभीर्याने नोंद घ्यावी आणि त्यानुसारच आपल्या प्रवासाचे नियोजन करावे. मार्गावरील सर्व मध्यवर्ती थांबा स्थानकांवरील गाड्यांच्या आगमनाची व प्रस्थानाची अचूक वेळ तपासण्यासाठी प्रवाशांनी प्रवास सुरू करण्यापूर्वी भारतीय रेल्वेच्या www.enquiry.indianrail.gov.in या चौकशी पोर्टलला भेट द्यावी किंवा मोबाईलमधील अधिकृत छढएड (छरींळेपरश्र ढॲरळप एपीींळऑ ड्रीशा) ॲपचा वापर करावा, असे रेल्वेच्या जनसंपर्क विभागाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

संपादकीय

## पुढच्या हाकांकडे कान

दिल्ली ही देशाच्या राजकीय रंगमंचाचीही राजधानी आहे हे सन १९५२पासूनच्या प्रत्येक निवडणूक इतिहासानं सिद्ध केलेलं सत्य पुन्हा आठवण्याचं कारण पुढच्या हाका ऐकण्याच्या हालचाली राजधानीत सुप्तपणे सुरू झाल्या आहेत. तीन वर्षांनंतरच्या लोकसभा निवडणुकीची खडाखडी म्हणून त्याकडं पाहणं घाईचं वाटलं, तरी काँग्रेस – विशेषतः राहुल गांधी यांनी जो आक्रमक पवित्रा घेतला आहे त्यावरून प्रमुख विरोधी पक्षानं आत्तापासूनच २०२९च्या लोकसभा निवडणुकीच्या रणनीतीच्या आखणीचा विचार सुरू केल्याचं निश्चितपणे दिसतं. अर्थात त्या मोठ्या राजकीय परीक्षेआधी २०२७ हे वर्ष येणार आहे आणि ते असेल उत्तर प्रदेशाच्या विधानसभा निवडणुकीचं. पुढच्या लोकसभेची सेमीफायनल उत्तर प्रदेशात रंगणार असली तरी दिल्ली त्याच्या ड्रेस रिहर्सलचं केंद्र राहणार हे स्पष्ट आहे.

स्वातंत्र्यदिनी झालेल्या वादानंतर काँग्रेसनं आपल्या कार्यक्रमांमध्ये ‘वंदे मातरम्’ची पहिली दोन सर्वमान्य कडवीच म्हणण्याचा निर्णय कायम ठेवला. त्यामागे १९३७चा काँग्रेस कार्यसमितीचा ठराव, गांधी-टागोर-नेहरू यांची ऐतिहासिक भूमिका आणि नंतर राष्ट्रीय गीताच्या सार्वजनिक सादरीकरणाबाबत झालेली चर्चा यांचा आधार दिला गेला. भाजपनं संपूर्ण ‘वंदे मातरम्’च्या बाजूनं देशव्यापी मोहीम सुरू करण्याची घोषणाही केली आहे. भारतीय राजकारणात प्रतीकांचं महत्त्व फार. बेरोजगारीच्या किंवा साखरेसह इतर महागाईच्या निर्देशांकाला झेंडा देता येत नाही; परीक्षा पेपरफुटीच्या बातम्या घोषवाक्य बनत नाहीत. पण ‘वंदे मातरम्’चा भावनिक विषय निवडणुकीच्या पॅकेजिंगचा भाग पटकन बनतो. मुळात ‘वंदे मातरम’चा इतिहासच गुंतागुंतीचा आहे. त्यामुळं गांधी मायलेक व काँग्रेसला ज्या सापळ्याची जाणीव असायला हवी होती, त्यात हा पक्ष स्वतःच चालत गेल्याचं काही काँग्रेस नेत्यांची अस्वस्थता बोलत आहे.

भाजपला असा फुलटॉस का द्यावा, हा काँग्रेस नेत्यांचा मुद्दा आहे. राष्ट्रवादाच्या मैदानावर खेळण्याचा प्रदीर्घ अनुभव भाजपकडं आहे. त्यांनी ‘वंदे मातरम्’चा विषय काढला आणि काँग्रेसनं त्यावर खुलासे द्यायला सुरुवात केली की राजकीय फायदा कोणाला होतो व होणार, या प्रश्नाचं उत्तर देण्यासाठी राज्यशास्त्रातल्या पीएच.डी.ची गरज नाही. संसदेत ‘वंदे मातरम्’ला राष्ट्रीय गीतासारखे कायदेशीर संरक्षण देणारी दुरुस्ती करण्यात आली, त्यानंतरच्या पहिल्याच स्वातंत्र्यदिनी ‘इंदिरा भवना’तील घटना घडली आहे.

हे सर्व सुरू असताना उत्तर प्रदेश शांत नाही. काही राजकीय विश्लेषणांनुसार यंदा उत्तर प्रदेशात दलित, ओबीसी आणि विविध सामाजिक गटांना आकर्षित करण्यासाठी भाजप, समाजवादी पक्ष आणि काँग्रेस यांच्यातली स्पर्धा टोकदार झाली आहे. भाजपचा सामाजिक संपर्क कार्यक्रम; काँग्रेसचा ओबीसी-दलित सामाजिक समीकरणावर भर, तर अखिलेश यादव यांच्या सपसमोर आपली ‘पीडीए’ रचना अधिक मजबूत करण्याचा प्रश्न. राममंदिर दानचोरीचा मुद्दा अयोध्या परिसर (केवळ पाच मतदारसंघ) वगळता विधानसभेवेळी विजयाचा एक्का ठरणार नसल्याचं स्पष्ट झालंय. काँग्रेससमोर सध्या मोठी अडचण आहे.

राहुल गांधी युवक, परीक्षा, पेपरफुटी, रोजगार आणि सामाजिक न्यायाच्या प्रश्नांवर आक्रमक होत आहेत. पण आपली निवडणूक कहाणी ‘छात्रों की गूंज’च्या रस्त्यानं तरुणांच्या भविष्या’शी जोडण्याची रणनीती आखणाऱ्या काँग्रेसनंच कथानकात अचानक ‘वंदे मातरम्’चं प्रकरण आणून भाजपच्या हाती मोठा मुद्दा दिला. ‘वंदे मातरम’चा वाद काँग्रेससाठी ‘शाहबानो प्रकरणासारखा क्षण’ ठरू शकतो का, असा प्रश्न काही राजकीय विश्लेषणांनी उपस्थित केला आहे. राहुल गांधींच्या ऐतिहासिक भूमिकेत तथ्य असलं, तरी त्याचे राजकीय परिणाम हाताबाहेर जाऊ शकतात का? अशी शंका काँग्रेसमध्येच उपस्थित होते आहे.

गेल्या १२ वर्षांतल्या नव्या भाजपच्या राजकारणाचं महत्त्वाचं वैशिष्ट्य म्हणजे निवडणूक प्रचाराचं राजकीय कथन किंवा नॅरेटिव्ह ठरवण्याची प्रचंड क्षमता त्या पक्षानं कमावली आहे. एखाद्या घटनेवरून निवडणुकीच्या राजकारणाचे भावी निष्कर्ष काढणं गैर; पण राजकारणात हवा बदलायला एक महिनाही खूप असतो आणि त्याची सुरुवात ‘जंतर-मंतर’वरच्या एखाद्या सकाळीही होऊ शकते. भाजपमधलं वातावरण पाहा. या वर्षाच्या सुरुवातीला पश्चिम बंगाल सर केल्यावर आणि पुढच्या दोनेक महिन्यात घटनाच अशा घडल्या की ‘पर्सेप्शन’च्या पातळीवर तरी सारं काही बदलत चालल्याचं वातावरण सध्या आहे.

**– डॉ. माधव सूर्यवंशी**

# भारतीय राजकारणातील ऋषितुल्य व्यक्तिमत्त्व : प्रणव मुखर्जी

भारताचे माजी राष्ट्रपती, ज्येष्ठ राजकीय नेते, कुशल प्रशासक आणि संसदीय परंपरांचे गाढे अभ्यासक प्रणव मुखर्जी यांचा आज स्मृतिदिन. ३१ ऑगस्ट २०२० रोजी वयाच्या ८४व्या वर्षी त्यांचे निधन झाले. त्यांच्या निधनाने भारतीय राजकारणातील एक प्रदीर्घ पर्व संपले. सत्ताधारी आणि विरोधी पक्षातील नेत्यांमध्ये समान आदराचे स्थान असलेले प्रणव मुखर्जी हे भारतीय राजकारणातील एक अजातशत्रू व्यक्तिमत्त्व म्हणून ओळखले जात.

जवळपास पाच दशकांहून अधिक काळ त्यांनी सार्वजनिक जीवनात सक्रिय राहून भारतीय राजकारण, प्रशासन आणि संसदीय लोकशाहीला मोलाचे योगदान दिले. त्यांचे ज्ञान, अनुभव, संयमी स्वभाव, विलक्षण स्मरणशक्ती आणि विविध विषयांवरील सखोल अभ्यास यामुळे त्यांना भारतीय राजकारणातील ‘चालती-बोलती लायब्ररी’ असे संबोधले जात असे.

११ डिसेंबर १९३५ रोजी पश्चिम बंगालमधील बीरभूम जिल्ह्यातील मिराटी येथे प्रणव मुखर्जी यांचा जन्म झाला. त्यांचे वडील कामदा किंकर मुखर्जी हे स्वातंत्र्यसैनिक आणि काँग्रेसचे ज्येष्ठ कार्यकर्ते होते. त्यांनी ब्रिटिशांविरुद्धच्या स्वातंत्र्यलढ्यात सक्रिय सहभाग घेतला आणि कारावासही भोगला. त्यामुळे लहानपणापासूनच प्रणव मुखर्जी यांच्यावर देशभक्ती, सार्वजनिक सेवा आणि सामाजिक बांधिलकीचे संस्कार झाले.

प्रणव मुखर्जी यांनी कोलकाता विद्यापीठातून इतिहास आणि राज्यशास्त्र विषयांत पदव्युत्तर शिक्षण घेतले तसेच कायद्याची पदवी मिळवली. राजकारणात येण्यापूर्वी त्यांनी काही काळ अध्यापन केले आणि पत्रकारितेच्या क्षेत्रातही काम केले. मात्र त्यांच्या मनात सार्वजनिक जीवनाची ओढ होती. १९६९ मध्ये त्यांनी सक्रिय राजकारणात प्रवेश केला आणि अल्पावधीतच आपल्या बुद्धिमत्ता, अभ्यासू वृत्ती, वक्तृत्व आणि संघटनकौशल्याच्या जोरावर राष्ट्रीय राजकारणात आपली वेगळी ओळख निर्माण केली.

राज्यसभेचे सदस्य म्हणून त्यांच्या संसदीय कारकिर्दीची सुरुवात झाली. पुढे त्यांनी केंद्र सरकारमध्ये अनेक महत्त्वाची खाती सांभाळली. अर्थमंत्री, संरक्षणमंत्री, परराष्ट्रमंत्री, वाणिज्यमंत्री अशा विविध जबाबदाऱ्या त्यांनी समर्थपणे पार पाडल्या. संसदीय कामकाजाचा प्रदीर्घ अनुभव आणि प्रशासनातील सखोल जाण यामुळे ते केंद्र सरकारमधील अत्यंत विश्वासार्ह नेत्यांपैकी एक बनले.

अर्थव्यवस्था, परराष्ट्र धोरण, संरक्षण, अंतर्गत सुरक्षा, संसदीय प्रक्रिया आणि घटनात्मक बाबी या विविध विषयांवर त्यांचे प्रभुत्व होते. संसदेतील विविध समित्यांच्या कामकाजातही त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. कोणत्याही विषयावर चर्चा करताना त्यांची तयारी, आकडेवारीवरील पकड आणि घटनात्मक तरतुदींचे ज्ञान पाहून अनेक जण प्रभावित होत असत.

प्रणव मुखर्जी यांचे वैशिष्ट्य म्हणजे ते केवळ सत्ताधारी पक्षाचे नेते नव्हते. संसदीय लोकशाहीत विरोधी पक्षाचे महत्त्व त्यांना पूर्णपणे मान्य होते. त्यामुळे विविध पक्षांतील नेत्यांशी त्यांचे मैत्रीपूर्ण संबंध होते. मतभेद असले तरी मनभेद नसावेत, ही त्यांच्या राजकीय वर्तनाची शैली होती. म्हणूनच ते सत्ताधारी आणि विरोधी पक्षातील नेत्यांमध्ये समान आदराचे पात्र ठरले.

२०१२ मध्ये प्रणव मुखर्जी भारताचे तेरावे राष्ट्रपती झाले. राष्ट्रपतीपदाची शपथ घेतल्यानंतर



त्यांनी या सर्वोच्च घटनात्मक पदाची प्रतिष्ठा आणि गांभीर्य कायम राखले. राष्ट्रपती म्हणून त्यांनी संविधानाच्या चौकटीत राहून आपल्या जबाबदाऱ्या पार पाडल्या. देशातील विविध विद्यापीठे, शैक्षणिक संस्था, युवक आणि विद्यार्थ्यांशी संवाद साधण्यावर त्यांनी विशेष भर दिला.

राष्ट्रपती भवन हे केवळ औपचारिक वास्तू न राहता लोकांशी संवाद साधणारे आणि ज्ञान-विचारांचे केंद्र व्हावे, यासाठीही त्यांनी अनेक उपक्रमांना प्रोत्साहन दिले. राष्ट्रपती म्हणून त्यांनी भारतीय लोकशाही, संविधान, शिक्षण आणि राष्ट्रीय एकात्मतेच्या मूल्यांवर सातत्याने भर दिला.

प्रणव मुखर्जी यांना २००८ मध्ये पद्मविभूषण आणि २०१९ मध्ये देशाचा सर्वोच्च नागरी सन्मान भारतरत्न प्रदान करण्यात आला. त्यांच्या दीर्घ सार्वजनिक जीवनाचा आणि राष्ट्रसेवेचा हा मोठा गौरव होता.

प्रणव मुखर्जी यांच्या व्यक्तिमत्त्वात राजकारणी, संसदपटू, प्रशासक, अभ्यासक आणि शिक्षक या सर्व भूमिका एकत्रित झाल्या होत्या. त्यांना इतिहासाची जाण होती, वर्तमानाची समज होती आणि भविष्यातील आव्हानांचा वेध घेण्याची दूरदृष्टी होती. संसदीय परंपरांचा त्यांनी केवळ अभ्यास केला नाही, तर त्या प्रत्यक्ष आचरणात आणल्या.

३१ ऑगस्ट २०२० रोजी दिल्ली येथे त्यांचे निधन झाले. त्यांच्या निधनाने भारतीय राजकारणातील एक अनुभवी, संयमी आणि विद्वान व्यक्तिमत्त्व काळाच्या पडद्याआड गेले. त्यांच्या जाण्याने निर्माण झालेली पोकळी सहज भरून निघणारी नाही.

आजच्या राजकारणात मतभेदांबरोबरच वैयक्तिक कटुता वाढताना दिसते. अशा काळात प्रणव मुखर्जी यांची राजकीय कारकीर्द अधिकच महत्त्वाची ठरते. अभ्यास, संयम, संवाद, संसदीय शिष्टाचार आणि लोकशाहीवरील निष्ठा या मूल्यांच्या आधारेही राजकारण करता येते, हे त्यांनी आपल्या दीर्घ सार्वजनिक जीवनातून सिद्ध केले.

भारतीय राजकारणातील या ऋषितुल्य व्यक्तिमत्त्वाचे योगदान भारतीय लोकशाहीच्या इतिहासात सदैव स्मरणात राहील. त्यांच्या स्मृतिदिनी या महान संसदपटू, अभ्यासू राजकारणी आणि भारतरत्न प्रणव मुखर्जी यांना विनम्र अभिवादन!

**– श्याम ठाणेदार**
**दौंड, जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

# राजस्थानातील ‘ब्लु’ सिटी आणि ‘गोल्डन’ सिटी

पर्यटन हा अनेकांच्या आवडीचा विषय तसाच तो माझा देखील, आज पर्यटन व्यवसायला व्यावसायिकतेचे स्वरूप आले आहे आणि देश विदेशात पर्यटन करणाऱ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. काश्मीर ते कन्याकुमारी, तसेच सेव्हन सिस्टर स्टेट्स या सह अनेक ठिकाणी धार्मिक पर्यटन, निसर्ग सौंदर्य पर्यटन त्याच बरोबर धाडसी पर्यटन, पावसाळी पर्यटन करणाऱ्यांची संख्या मोठी आहे. मा आणि मिसेस सौ. अलका आम्ही दोघेही बॅग भरो निकल पडो अशा पद्धतीचे पर्यटन नेहमीच करत असतो.काही दिवसांपूर्वी राजस्थान मधील जैसलमेर या वाळवंट प्रदेशाबाबत माहिती मिळाली त्यामुळे तेथे जाण्यासाठी तयारीला लागलो आणि जाण्याचे नियोजन करत असतांना सहज विषय निघाला तर बालमित्र विलास देशपांडे हा देखील येण्यास तयार झाला. त्याप्रमाणे मी आणि सौ. अलका तसेच



विलास त्याची मिसेस सौ. स्नेहल असे चौघे जैसलमेर, जोधपुर जाण्यासाठी तयारी केली.जैसलमेर येथे जाण्यासाठी बांद्रा टर्मिनस मुंबई येथुन दर शुक्रवारी आठवड्यातून एकदाच ट्रेन ऊपलब्ध आहे ही ट्रेन दुसऱ्या दिवशी सकाळी दहा वाजता जैसलमेर येथे पोहचते. त्याच बरोबर जैसलमेर येथे थेट विमानाने, तसेच जोधपुर पर्यंत खाजगी स्विपर कोच द्वारा देखील जाता येते.

जैसलमेर या शहराचे वैशिष्ट्य म्हणजे हे भारताच्या पश्चिम भागातील वाळवंट प्रदेशातील संरक्षण दृष्टीने अतिशय महत्त्वाचे शहर आहे. येथुन साधारणपणे १२० किलोमीटरवर तनोट माता मंदिर आहे. या मंदिराचे वैशिष्ट्य म्हणजे या भागात पाकिस्तान कडुन मोठ्याप्रमाणावर झालेल्या हल्लयात या मंदिराला कुठल्याही प्रकारचे नुकसान झाले नाही, त्यामुळे हे देवस्थान जागृत समजले जाते. हा परिसर पुर्णपणे सीमा सुरक्षा दलाच्या अखत्यारीत येतो ऐवढेच नव्हे तर मंदिरातील पुजारी देखील हे देखील बीएसएफ चे जवान आहेत.त्यापुढे बावीस किलोमीटरवर भारत पाकिस्तान सीमा हद्द आहे.लोंगेवाला ही युद्ध भुमी म्हणून ओळखली त्याच बरोबर जवळच लोंगेवाला वॉर म्युझियम आहे. या ठिकाणी भारत पाक युद्ध झाले होते तेथे पाकिस्तान चे जप्त केलेले रणगाडे, जिप हे पर्यटकांना पाहण्यासाठी ठेवले आहेत त्याच बरोबर याठिकाणी पंधरा मिनिटांचा शो देखील दाखवला जातो. जैसलमेर वरून या ठिकाणी पोहचण्यासाठी खाजगी वाहने ऊपलब्ध आहे आणि दिवसभराचे भाडे अंदाजे तीन ते सहा हजार रुपये आहे. जैसलमेर नंतर केवळ रामगढ या ठिकाणी जेवण नाष्ट्याची सोय ऊपलब्ध आहे पुढे मात्र पाणी सुद्धा मिळत नाही. जैसलमेर येथील किल्ला सुप्रसिद्ध असुन तो पाहिलाच पाहिजे त्याच बरोबर या शहरापासून कुलधारा हे ऊजाड पडलेले एक गाव आहे, या गावाला भुतांचे गाव म्हणून देखील संबोधले जाते, या गावाचा इतिहास म्हणजे या गावात रहाणाऱ्या एका सुंदर मुली शी त्याकाळातील राजाने विवाह करण्याचा हट्ट धरला आणि मी ऊद्या येऊन या मुलीशी लग्न करणार असे सांगितले. या गावातील मालीवाल ब्राम्हण समाज लग्न करुन देण्यासाठी तयार नव्हता त्यामुळे या गावातील तसेच आजुबाजुच्या ८४ गावातील गावकऱ्यांनी एका रात्रीत स्थलांतर केले आणि या गावात कोणीही राहु शकणार नाही असा शाप दिला तेव्हा पासून हे कुलधारा गाव ओस पडले आहे, या ठिकाणी पर्यटकांनी आवर्जून भेट दिली पाहिजे. या शहरात अनेक टोलेजंग मोठमोठ्या हवेल्या आहेत पटवा कि हवेली या सारख्या हवेल्या या पर्यटन स्थळ म्हणून प्रसिद्ध आहेत. त्याच बरोबर जैसलमेर शहराचे वैशिष्ट्य म्हणजे येथुन तीस चाळीस किलोमीटर परिघात डेझर्ट कॅम्प चा अनुभव. या डेझर्ट कॅम्प मधे राहण्यासाठी अत्याधुनिक सुविधांनी ऊपलब्ध असलेले कॅम्पस आहेत येथे रात्रीचा मुक्काम होतो त्याकाळात ऊंट सफारी, ऊघड्या जीप मधील डेझर्ट सफारी आवर्जून केली पाहिजे. डेझर्ट सफारी साठी साधारणपणे दोन ते तीन हजार रुपये खर्च येतो. रात्री कॅम्प मधे राजस्थानी संस्कृतीचे संगीत कार्यक्रम होतात, रात्रीचे जेवण, नाष्टा, सकाळी चहा नाष्टा हे त्यात समाविष्ट असते मात्र येथे रहाण्यासाठी एका कुटुंबाला दोन ते पाच हजार रुपये इतका खर्च येतो. हा परिसर पुर्णपणे वाळवंटी आहे. या भागाला पाणी पुरवठा होतो ते पंजाब मधून आलेल्या इंदिरा नहरच्या माध्यमातून. जैसलमेर हे एक ऐतिहासिक शहर आहे. या शहराचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे या शहरातील किल्ले, घरे, हवेल्या या सगळ्या सोनेरी खडकापासुन बनविलेल्या आहेत या मुळेच या शहराची सोनेरी शहर म्हणजेच गोल्डन शहर अशी ओळख आहे.जैसलमेर येथे दोन ते तीन दिवस पुरेसे आहेत.

राजस्थान राज्यच मुळात किल्ले, राजवाडे, भव्यदिव्य हवेल्या, ओळखले जाते. जैसलमेर येथुन तीनशे वीस किलोमीटरवर रंगीलो राजस्थान मधील दुसरे ऐतिहासिक शहर म्हणजे जोधपुर.जैसलमेर पर्यटन केल्या नंतर आम्ही जोधपुर येथे आलो. जोधपूर शहराचा इतिहास मोठा आहे तसेच ते एक ऐतिहासिक शहर आहे. राठोड वंशज राजपुत राव जोधा यांनी या शहरची स्थापना केली. येथुन जवळच असलेले मंडोर ही मारवाड राज्याची जुनी राजधानी. जोधपुर हे पुर्वी पासुनच राजस्थान चे मुख्य व्यापारी केंद्र. १९४९ मधे हे संस्थान भारतात विलीन झाले भाग आणि राजस्थानचा भाग बनले. या शहरातील मुख्य आकर्षण म्हणजे मेहरानगड किल्ला. हा किल्ला जोधपूर शहरात जमिनीपासून सुमारे ४०० फूट उंच टेकडीवर वसलेला आहे.मिहिर' (सूर्य) आणि 'गड' (किल्ला) या संस्कृत शब्दांवरून 'मेहरानगड' नाव पडले आहे.किल्ला पहाण्यासाठी माणशी दोनशे रुपये तिकिट शुल्क तसेच लिफ्ट साठी माणशी पन्नास रुपये तर गाईड साठी अडीचशे रूपये आकारले जातात. या शिवाय शहरात जसवंत थडा, घंटाघर, माछिया बायोलॉजिकल पार्क, ऊमेद भवन (या ठिकाणी प्रियंका चोप्रा) हिचा विवाह संपन्न झाला होता) मंडोर गार्डन अशी अनेक पर्यटन स्थळे आहेत. येथे आम्ही दोन दिवस मूक्काम केला आणि मुंबईच्या परतीच्या प्रवासाला लागलो. ज्या प्रमाणे जैसलमेर हे सोनेरी शहर म्हणुन ओळखले जाते तसेच जोधपुर हे ब्लू सीटी 'म्हणुन देखील ओळखले जाते. या शहरातील एका भागातील घरांना नगरपंचायतीच्या खर्चाने निळ्या रंगाने रंगवले आहे त्याच बरोबर अनेक इमारती घरे ही निळ्या रंगाची आहेत. राजस्थान ची राजधानी असलेले जयपुर शहर देखील पिंक सीटी म्हणून ओळखली जाते. जोधपूर येथे जाण्यासाठी रेल्वे बस तसेच विमान सेवा उपलब्ध आहे.

राजे राजवाडे, संस्थानिक, विरांची भुमी, तसेच संरक्षण श्रेत्रात महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या राजस्थानला एकदातरी भेट द्यायला हवीच. विशेष म्हणजे या दोन्ही शहरांतील आदरातिथ्य अतिशय भारावून टाकणारे होते.

**– अनंत बोरसे**
**शहापूर जिल्हा ठाणे**
**९१५८४९५०३७**

## द विझार्ड

तीनवेळा स्वर्ण पदक
गाजविले ऑलिंपिक
जर्मनीला हरवे जेंव्हा
हिटलर होई अगतिक

हॉकी स्टीकशी चेंडूची
जणू चुंबकी जवळिक
चारशे गोल सर्वोच्च ते
क्रीडाजगते आगळीक

घालून देई खासआदर्श
कसे खेळायचे सांघिक
नवपिढी व्हिडिओ पाहे
खेळातरंगत अलौकिक

सामनाहरेक नेत्रदिपक
शास्त्रशुद्ध ते वैधानिक
नाळ जुळली मैदानाशी
स्नेह बंधन ते भावनिक

हॉकी स्टीक भारावली
शक्ती जणूं असे दैविक
जगता बनवी भावनिक
प्रेक्षकदर्शक हो भाविक

पारणे फेडती डोळ्यात
स्तब्ध निशब्द रे रसिक
ना भुतो ना भविष्यती
खेळ हरेक ऐतिहासिक

**– हेमंत मुसरीफ, पुणे**
**९७३०३०६९९६**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

## थोडक्यात बातम्या

# जिल्हा नियोजन निधीत खासदारांना १० टक्के कोटा मिळायलाच हवा
## छत्रपती शाहू महाराजांच्या नेतृत्वात मविआच्या खासदारांचे मुख्यमंत्र्यांना निवेदन



**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.३०, चंद्रपूर :** लोकसभा मतदारसंघाचा अथांग विस्तार आणि त्या तुलनेत मिळणारा अत्यंत अपुरा खासदार निधी यामुळे ग्रामीण भागातील विकासकामे खोळंबत असल्याने, महाविकास आघाडीच्या खासदारांनी खासदार छत्रपती शाहु महाराज यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्राचे मुख्यमंत्री तथा वित्तमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन तातडीने अतिरिक्त निधी उपलब्ध करुन देण्याबाबत मागण्यांचे निवेदन सादर केले आहे. सध्या खासदार निधीअंतर्गत वर्षाला केवळ ५ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध होतो, जो एका मोठ्या मतदारसंघातील शेतडो गावांच्या विकास गरजा भागविण्यासाठी अत्यंत तोकडा पडत आहे. यामुळे स्थानिक पातळीवर रस्ते, पायाभूत सुविधा व इतर नागरी कामे करताना मोठ्या अडचणी निर्माण होत असून, राज्य शासनाने आपल्या विविध योजनांमधून लोकप्रतिनिधींना पुरेसा निधी उपलब्ध करुन देणे आवश्यक असल्याचे खासदारांनी निदर्शनास आणून दिले.या समस्येवर तोडगा म्हणून खासदारांनी मुख्यमंत्र्यांकडे ५ प्रमुख मागण्या मांडल्या आहेत, ज्यामध्ये जिल्ह्याच्या जिल्हा नियोजन विकास निधीच्या वार्षिक बजेटमधून १० टक्के निधी खासदारांच्या शिफारशीनुसार देण्यात यावा ही मुख्य मागणी आहे. याशिवाय राज्याच्या अर्थसंकल्पातून सार्वजनिक बांधकाम विभाग, मुख्यमंत्री ग्रामीण सडक योजना आणि केंद्रीय मार्ग निधी अंतर्गत प्रत्येक जिल्ह्यात किमान दोन-दोन रस्ते व विकासकामे खासदारांच्या शिफारशीनुसारमंजूर करण्याची विनंती करण्यात आली आहे, तसेच राज्य परंपरेनुसार बजेट अधिवेशनापूर्वी सर्व खासदारांची बैठक घेण्याची मागणी केली आहे.या निवेदनावर खासदार प्रतिभा धानोरकर, खासदार वर्षा गायकवाड, खासदार प्रणिती शिंदे, खासदार बळवंत वानखेडे, आणि खासदार शामकुमार बर्वे यांच्या प्रमुख स्वाक्षऱ्या असून, लोकप्रतिनिधीच्या या रास्त मागण्यांचा सहानुभूतीपूर्वक विचार करुन राज्य सरकारने यावर त्वरित सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा खासदारांनी व्यक्त केली आहे.

***विविध विकास कामांसाठी मागितला निधी***

ग्रामीण भागातील विकास कामे खोळंबत असल्याने, महाविकास आघाडीच्या खासदारांनी खासदार छत्रपती शाहु महाराज यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्राचे मुख्यमंत्री तथा वित्तमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन तातडीने अतिरिक्त निधी उपलब्ध करुन देण्याबाबत मागण्यांचे निवेदन सादर केले आहे.

# इंग्लिश मीडियम स्कूल, शिरवळ येथे राष्ट्रीय क्रीडा दिन साजरा



**अक्षराज : स्वप्निल जावळे**

**दि.३०, शिरवळ (सातारा) :** पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या रयत शिक्षण संस्थेच्या रयत इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये राष्ट्रीय क्रीडा दिन मोठ्या उत्साहात आणि क्रीडामय वातावरणात साजरा करण्यात आला. भारताचे थोर हॉकीपटू मेजर ध्यानचंद यांच्या जयंतीनिमित्त दरवर्षी दिनांक २९ ऑगस्ट हा दिवस राष्ट्रीय क्रीडा दिन म्हणून साजरा केला जातो. त्यानिमित्ताने शाळेत विविध क्रीडा स्पर्धा आणि कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाची सुरुवात मेजर ध्यानचंद आणि संस्थेचे संस्थापक कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. यावेळी शाळेच्या मुख्याध्यापिका वर्षा मांढरे यांनी विद्यार्थ्यांना क्रीडा दिनाचे महत्त्व सांगताना, निरोगी आयुष्यासाठी खेळाची किती गरज आहे, यावर मार्गदर्शन केले. तसेच खेळामुळे संघभावना, शिस्त आणि नेतृत्वगुण विकसित होतात, असे प्रतिपादन त्यांनी केले. या खास दिनानिमित्त शाळेतील क्रिडा शिक्षक सूरज नेवसे यांनी प्राथमिक व माध्यमिक विभागाच्या विद्यार्थ्यांसाठी वेगवेगळ्या मैदानी व बौद्धिक खेळांचे आयोजन केले होते. यामध्ये धावणे, खो-खो, कबड्डी, लंगडी यांसारख्या मैदानी खेळांसोबतच बुद्धिबळ अशा खेळांचा समावेश होता. सर्व विद्यार्थ्यांनी या स्पर्धांमध्ये अतिशय उत्साहाने आणि खिलाडूवृत्तीने सहभाग घेतला. हा क्रीडा दिन यशस्वी करण्यासाठी शाळेतील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि क्रीडा शिक्षकांनी विशेष परिश्रम घेतले.

# महाराष्ट्रातील रुग्णवाहिका चालकांना मोठा दिलासा



**अक्षराज : चंद्रकांत भोयर**

**दि.३०, राजुरा (चंद्रपूर) :** महाराष्ट्रातील रुग्णवाहिका चालकांच्या पगारवाढीसह थकीत एरियर्सच्या मागणीसंदर्भात सर्वोच्च न्यायालयाच्या माध्यमातून चालकांना मोठा दिलासा मिळाला आहे. रुग्णवाहिका चालकांच्या वेतनवाढीचा तसेच मागील कालावधीतील थकीत वेतन फरकाचा प्रश्न अनेक दिवसांपासून प्रलंबित होता.

या प्रकरणात चालकांच्या हक्कासाठी ॲड.दीपक चटप व ॲड.सिद्धार्थ चपळगावकर यांनी न्यायालयीन स्तरावर प्रभावीपणे बाजू मांडली. त्यांच्या माध्यमातून सदर प्रकरणात चालकांच्या बाजूने महत्त्वपूर्ण विजय मिळाला असून, त्यामुळे विदर्भातील रुग्णवाहिका चालकांना मोठा दिलासा मिळाला आहे. या निर्णयामुळे संबंधित रुग्णवाहिका चालकांना पगार वाढ तसेच पात्रतेनुसार थकीत एरियर्सची रक्कम मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

चालकांच्या मेहनतीला आणि त्यांच्या न्याय्य हक्काला न्याय मिळवून देणारा हा निर्णय महत्त्वपूर्ण मानला जात आहे. या विजयाबद्दल महाराष्ट्रातील रुग्णवाहिका चालकांकडून ॲड. दीपक चटप, ॲड.सिद्धार्थ चपळगावकर,यांचे आभार व्यक्त करण्यात येत असून,तसेच जनसंपर्क कार्यालयात रुग्णवाहकाकडून शाल,श्रीफळ,पुष्पगुच्छ देऊन ॲड दीपक चटप यांचे सत्कार करण्यात आले.आपल्या हक्कासाठी न्यायालयीन लढा उभारून मिळवून दिलेल्या दिलासाबद्दल समाधान व्यक्त केले जात आहे.

# गुडसूर येथे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती उत्साहात साजरी



**अक्षराज : जयराम देमगुंडे**

**दि.३०, उदगीर (लातुर) :** साहित्यरत्न, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती गुडसूर येथे विविध उपक्रमांनी उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमात लहान बालकांनी अण्णाभाऊ साठे यांच्या जीवनकार्यावर व विचारांवर प्रभावी भाषणे करून उपस्थितांची मने जिंकली.

कार्यक्रमाचे विशेष आकर्षण म्हणजे बालकांनी घेतलेली भाषणे होय. या चिमुकल्या वक्त्यांनी अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्य, शाहिरी, सामाजिक संघर्ष आणि परिवर्तनवादी विचारांवर आपल्या अनुभवातून व अभ्यासातून विचार मांडले. बालकांमध्ये वाचनाची आवड, वक्तृत्वकौशल्य आणि महापुरुषांच्या विचारांची जाणीव निर्माण व्हावी, या उद्देशाने सर्व बालवक्त्यांना पुस्तके देऊन सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा परिषद सदस्य मा. उषाताई येमुनाजी भुजबळ तसेच पंचायत समिती मा. उपसभापती बाळासाहेब मरलापल्ले उपस्थित होते. त्यांनी अण्णाभाऊ साठे यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकत त्यांच्या विचारांचा आजच्या पिढीने आदर्श घ्यावा, असे आवाहन केले.

यावेळी प्रमुख वक्ते प्रा.शिवाजीराव देवनाळे व. प्रा व्यंकट सूर्यवंशी यांनी अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यिक व सामाजिक योगदानाबाबत मार्गदर्शन केले. अण्णाभाऊंनी आपल्या लेखणी, शाहिरी आणि साहित्याच्या माध्यमातून कष्टकरी, शोषित व वंचित समाजाच्या प्रश्नांना वाचा फोडली. त्यांच्या विचारांची प्रेरणा नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्याची गरज असल्याचे वक्त्यांनी सांगितले.

कार्यक्रमादरम्यान उपस्थित मान्यवरांनी बालकांच्या वक्तृत्वाचे कौतुक करून त्यांना पुढील शैक्षणिक व सामाजिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. पुस्तक हेच परिवर्तनाचे प्रभावी साधन असून वाचनातून विचार आणि विचारातून परिवर्तन घडते, असा संदेश यावेळी देण्यात आला.

अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त आयोजित या कार्यक्रमामुळे गुडसूर येथे सामाजिक प्रबोधन, वाचन संस्कृती आणि महापुरुषांच्या विचारांचा जागर करण्याचा उपक्रम घडून आला. कार्यक्रमास ग्रामस्थ, समाजबांधव, विद्यार्थी, शिक्षक व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या विचारांना अभिवादन करून त्यांच्या परिवर्तनवादी विचारांचा वारसा पुढील पिढीपर्यंत पोहोचविण्याचा संकल्प यावेळी करण्यात आला.

# अण्णाभाऊंचे साहित्य अन्यायाविरुद्ध लढण्याची प्रेरणा देते - प्रा.अनंतराव शिंदे

**अक्षराज : बालासाहेब फुलपगार**

**दि.३०, पालम (परभणी) :** साहित्यासम्राट लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांनी आपल्या साहित्याच्या माध्यमातून कष्टकरी, शोषित आणि पीडित समाजाचे दुःख वेशीवर टांगले. त्यांच्या साहित्यामध्ये अन्यायाविरुद्ध लढण्याची प्रेरणा आणि सामाजिक परिवर्तनाची ताकद होती, असे प्रतिपादन मराठा सेवा संघाचे माजी जिल्हाध्यक्ष तथा केंद्रीय सदस्य प्रा. अनंतराव शिंदे यांनी केले.

पालम तालुक्यातील पेठ पिंपळगाव येथे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त आयोजित



कार्यक्रमात ते प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते.

प्रा. शिंदे पुढे म्हणाले की, अण्णाभाऊ साठे यांनी आपल्या लेखणीच्या माध्यमातून समाजातील वंचित, कष्टकरी आणि उपेक्षित घटकांच्या व्यथा मांडल्या. त्यांच्या साहित्याने सामान्य माणसाला संघर्ष करण्याची प्रेरणा दिली. त्यामुळे अण्णाभाऊंचे साहित्य हे केवळ मनोरंजनाचे साधन नसून सामाजिक परिवर्तनासाठीचे प्रभावी हत्यार ठरले आहे.

या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून युवा उद्योजक कृष्णा भोसले, माजी सरपंच काशिनाथराव शिंदे, श्री. कसबे, उत्तमराव शिंदे, विजयकुमार गाणार, पंडितराव शिंदे, उपसरपंच मोकणपल्ले, पंचायत समिती सदस्य विद्यादेवी सकत यांच्यासह ग्रामस्थ व नागरिकांची उपस्थिती होती.

# मंगळागौर स्पर्धेतून संस्कृतीचा सोहळा व नारीशक्तीचा जागर – महापौर सुजाता पाटील

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.३०, नवी मुंबई :** मंगळागौर हा महाराष्ट्राच्या संस्कृतीचा सोहळा असून, या माध्यमातून नारीशक्तीचा जागर होतो. एकजुटीने आनंद साजरा करण्यासोबतच परिवर्तन घडविता येते. मंगळागौर स्पर्धेत सहभागी होणाऱ्या महिला या संस्कृतीच्या जतनाच्या दूत आहेत, असे प्रतिपादन नवी मुंबईच्या महापौर सुजाता पाटील यांनी केले.

नवी मुंबई महानगरपालिका महिला व बालकल्याण समितीच्या वतीने वाशी येथील विष्णुदास भावे नाट्यगृहात महिला मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी महापौर पाटील बोलत होत्या. महिलांच्या सर्वांगीण विकासासाठी महानगरपालिका विविध योजना व उपक्रम राबवीत असून, महिलांना चारचाकी वाहन चालविण्याचे प्रशिक्षण देणारी योजना महासभेत मंजूर करण्यात आली आहे. त्यामुळे भविष्यात एनएमएमटी बससेवेत महिला चालकही कार्यरत होतील, असे त्यांनी सांगितले. मुख्यमंत्री महोदयांच्या संकल्पनेतील एकल महिलांसाठीच्या योजनांसाठी नोंदणी सुरू असल्याची माहितीही त्यांनी दिली.

बेलापूर विधानसभा सदस्य आमदार मंदाताई म्हात्रे यांनी मंगळागौर स्पर्धेच्या




माध्यमातून संस्कृतीचे जतन होत असल्याचे सांगितले. महिलांसाठी महानगरपालिका राबवीत असलेल्या योजनांची लवकरात लवकर प्रत्यक्ष अंमलबजावणी करावी, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

सभागृह नेते सागर नाईक यांनी नवी मुंबई हे परस्पर प्रेमभाव जपणारे कुटुंब असल्याचे सांगत महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी महानगरपालिका कटिबद्ध असल्याचे नमूद केले. मुख्यमंत्री महोदयांच्या संकल्पनेतील 'लखपती दीदी' योजना यशस्वीपणे राबविण्याकडे विशेष लक्ष दिले जात असल्याचे त्यांनी सांगितले.

महिला व बालकल्याण समितीच्या सभापती सलुजा सुतार यांनी समितीमार्फत २० प्रकारच्या योजना व उपक्रम राबविले जात असल्याची माहिती दिली. महिला बचतगटांनी उत्पादित केलेल्या वस्तूंच्या विक्रीसाठी केंद्र उपलब्ध करून देण्याचे प्रयत्न सुरू असून, दिवाळीपूर्वी त्यांच्या उत्पादनांच्या विक्रीसाठी महोत्सव आयोजित करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

जीवन आधार फाऊंडेशनच्या संस्थापक ॲड. रेखा चिरनेरकर यांनी महिलांनी आपल्यातील कौशल्ये ओळखून त्याचे रोजगारात रूपांतर करण्यावर भर द्यावा, असे आवाहन केले. उत्पादित वस्तूंच्या विक्रीसाठी एकत्रित प्रयत्न करण्यासह समाजमाध्यमांचा प्रभावी वापर करण्याचा सल्लाही त्यांनी दिला.

मंगळागौर स्पर्धेच्या अंतिम फेरीत ऐरोलीच्या रूचिरा ग्रुपने प्रथम क्रमांक पटकाविला. नेरूळच्या नारीशक्ती मंगळागौर समूहाने द्वितीय, तर वाशीचा राजा महिला बचत गटाने तृतीय क्रमांक मिळविला. ऐरोलीच्या आदिशक्ती ग्रुप आणि बेलापूरच्या नूतन एकता महिला मंडळाला उत्तेजनार्थ पारितोषिक देण्यात आले. राधेश्याम महिला मंडळ, तुर्भे; धनलक्ष्मी महिला मंडळ, कोपरखैरणे; संस्कृतीची शान समूह, घणसोली; नव्या फाऊंडेशन, घणसोली आणि नृत्य इल्यूजन डान्स स्टुडिओ, नेरूळ या पाच समूहांना उल्लेखनीय सादरीकरणाबद्दल सन्मानित करण्यात आले.

नृत्य कलावंत अशिमिक कामठे आणि आरती पानसरे यांनी स्पर्धेचे परीक्षण केले. त्यांच्या नृत्यसादरीकरणालाही रसिकांनी उत्स्फूर्त दाद दिली. स्पर्धेत नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील ३२ महिला समूहांनी सहभाग घेतला होता. प्राथमिक फेरीतून १० समूहांची अंतिम फेरीसाठी निवड करण्यात आली. सर्व वयोगटांतील महिलांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

मेळाव्यात ६५ महिला बचतगट व महिला मंडळांनी उत्पादित केलेल्या साहित्याचे स्टॉल्स उभारण्यात आले होते. सकाळी ९ वाजल्यापासून सुरू झालेल्या मंगळागौर स्पर्धेसह सांस्कृतिक कार्यक्रमांना महिलांचा मोठा प्रतिसाद मिळाला.

# आर. सी. पटेल माध्यमिक विद्यालयात 'वृक्षबंधन' कार्यक्रम उत्साहात साजरा

**अक्षराज : नंदकुमार बोरसे**

**दि.३०, शिरपूर :** शिरपूर तालुक्यातील बभळाज येथील आर. सी. पटेल माध्यमिक विद्यालयात रक्षाबंधनाच्या पवित्र सणाचे औचित्य साधून अनोख्या आणि निसर्गपूरक अशा 'वृक्षबंधन' या स्तुत्य उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमांतर्गत शाळेतील गाईडच्या विद्यार्थिनींनी नुकत्याच लावलेल्या आणि दत्तक घेतलेल्या वृक्षांना राख्या बांधून त्यांच्या संवर्धनाची शपथ घेतली. या नाविन्यपूर्ण उपक्रमामुळे परिसरात निसर्गप्रेमाचा एक नवा आदर्श निर्माण झाला आहे.

या नाविन्यपूर्ण कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे मुख्याध्यापक आर. एल. तवर होते. शाळेच्या परिसरात नुकतेच वृक्षारोपण करण्यात आले होते. या उपक्रमाचा एक भाग म्हणून प्रत्येक विद्यार्थ्याला एक-एक वृक्ष दत्तक देण्यात आला होता. रक्षाबंधनाच्या निमित्ताने, गाईडच्या विद्यार्थिनींनी याच दत्तक वृक्षांना मोठ्या प्रेमाने आणि उत्साहाने राख्या बांधल्या. ज्याप्रमाणे भाऊ बहिणीचे रक्षण करतो, त्याचप्रमाणे




आम्ही या वृक्षांचे रक्षण करू आणि त्यांना मोठे करू, अशी भावनात्मक शपथ या विद्यार्थिनींनी घेतली.

कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून मार्गदर्शन करताना मुख्याध्यापक आर. एल. तवर सर यांनी स्काऊट गाईड विभागातील गाईड विद्यार्थिनींचे भरभरून कौतुक केले. ते म्हणाले, रक्षाबंधन हा केवळ भाऊ-बहिणीच्या प्रेमाचा सण नाही, तर तो संरक्षणाचे वचन देण्याचा सण आहे. आज तुम्ही या चिमुकल्या रोपट्यांना राख्या बांधून खऱ्या अर्थाने निसर्गाप्रती आपले कर्तव्य निभावले आहे. वृक्ष हे आपले मूक मित्र आहेत; ते आपल्याला प्राणवायू, फळे आणि सावली देतात. तुम्ही दत्तक घेतलेली ही झाडे जेव्हा मोठी होतील, तेव्हा तीच तुमचे आयुष्यभर रक्षण करतील. आज तुम्ही घेतलेली ही संवर्धनाची शपथ केवळ एक दिवसापुरती मर्यादित न राहता ती जन्मभर टिकवा. निसर्गाशी जुळलेली ही नाळ भविष्यात तुम्हाला नक्कीच समृद्ध करेल.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्यालयाचे स्काऊट मास्टर बी. व्ही. मोरे यांनी केले, तर उपस्थितांचे आभार गाईड कॅप्टन शीतल पाटील यांनी मानले. या अनोख्या वृक्षबंधनाच्या कार्यक्रमामुळे शाळेच्या परिसरात आनंदाचे आणि निसर्गाप्रती कृतज्ञतेचे वातावरण निर्माण झाले होते. या उपक्रमासाठी शाळेतील डी.ए..पावरा, आर .टी. पाटील ,बी.बी .लोहार, एस.जी .वडिले,एस.जे.भामरे,डी.के. पाटील, एस. एम. पाटील, एस .एस. पाटील, नंदकिशोर चौधरी, सौ.भारती पाटील,सौ.जे.एन. पाटील, व्ही .एस. पाटील, आर.सी.पाटील, निकिता परदेशी, विक्रम पावरा, श्रीराम पावरा, गुलाब पाटील, सागर शिंदे सर्व शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

# एटीएम मशीनमध्ये छेडछाड करून पैसे काढणारी चौकडी जेरबंद; धावत्या एक्स्प्रेसमधून तिघांना पकडले

## भिवंडी - कसारा रेल्वे स्थानकापर्यंत सिनेस्टाईल शोध मोहीम

अक्षराज : विनोद वास्कर

दि.३०,कल्याण (ठाणे) : कल्याण पूर्वेतील चक्कीनाका लोकग्राम परिसरामध्ये एटीएम सेंटरमध्ये ग्राहकांची फसवणूक करण्याचा एक अत्यंत धक्कादायक आणि नवा प्रकार उघडकीस आला आहे. एटीएम मशीनच्या कार्ड स्लॉटमध्ये चक्क 'सुपर ग्लु' म्हणजेच त्वरित चिकटणारा पदार्थ लावून ग्राहकांना गंडा घालणाऱ्या एका चार जणांच्या टोळीचा पर्दाफाश झाला असून, स्थानिक तरुणांच्या सतर्कतेमुळे यातील एका आरोपीला रंगेहाथ पकडण्यात यश आले आहे. तर त्याचे अन्य तीन साथीदार घटनास्थळावरून पळ काढण्यात यशस्वी झाले होते, मात्र त्यांनाही आता ताब्यात घेण्यात आले आहे. हे भामटे एटीएम सेंटरमध्ये जाऊन मशीनच्या कार्ड टाकण्याच्या जागेवर सुपर ग्लु लावत असत.

यामुळे पैसे काढण्यासाठी आलेल्या ग्राहकाचे एटीएम कार्ड मशीनमध्ये अडकून पडत असे. याच वेळी, मागे उभे राहून हे चोरटे ग्राहकाचा 'पिन' क्रमांक हेरत असत. कार्ड अडकल्याने गोंधळलेल्या ग्राहकाला बनावट हेल्पलाईन नंबर देऊन मदतीचे नाटक करायचे आणि ग्राहकाने काढता पाय घेताच त्यांच्या खात्यातील रक्कम लंपास करायची, असा या टोळीचा अत्यंत सुनियोजित डाव होता.

एका व्यक्तीचे एटीएम कार्ड अशाच प्रकारे मशीनम ध्ये अडकले असता, तेथे उपस्थित असलेल्या काही स्थानिक आणि जागरूक तरुणांना या प्रकाराचा संशय आला. त्यांनी तातडीने हालचाल करत या संशयित भामट्याला पकडले. या आरोपीला शिवसेना संपर्कप्रम ुख महेश गायकवाड यांच्या कार्यालयात आणण्यात आले आणि त्यानंतर पोलिसांना पाचारण करून त्याला पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले.

शिताफीने तपास करीत इतर तिघांनाही पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. राजेशकुमार रामलालप्रसाद यादव (३१), हरीराम कुमार उमेश सिंग (२५), रोहितकुमार बिनोद सिंग (२६) आणि सुदिपकुमार सुरेंद्र विश्वकर्मा उर्फ सुरदिप (२६) अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे असून हे सर्व मूळचे बिहार राज्याच्या गया जिल्ह्यातील असून सध्या ते भिवंडीतील राजनोळी गाव आणि कोनगांव येथे वास्तव्यास होते.

पोलिसांनी अटक केलेल्या आरोपीकडून फसवणुकीसाठी वापरण्यात येणारी हत्यारे, साहित्य, अनेक चोरीची एटीएम कार्ड्स, सुलर ग्लु आणि रोख रक्कम जप्त केली आहे. ताब्यात असलेल्या आरोपीकडून मिळालेल्या तोकड्या माहितीच्या आधारे कोळसेवाडी पोलिसांच्या पथकाने भिवंडीतील राजनोळी गाव आणि कोनगांव परिसरात शोध घेतला. मात्र तिथे तेथूनही पळून गेल्याचे समजताच पोलिसांनी भिवंडीपासून कसारा रेल्वे स्थानकापर्यंत शोध मोहीम सुरू ठेवली. या सिनेस्टाईल शोध मोहिमेत धावत्या एक्स्प्रेसमध्ये शोध घेऊन उर्वरित तिघाही बदमाशांना ताब्यात घेतले.

या टोळीने कल्याण शहर आणि आजूबाजूच्या इतर ठिकाणी अशाच प्रकारच्या आणखी किती फसवणुका केल्या आहेत, याचा सखोल तपास पोलिसांकडून सुरू आहे. नागरिकांनी एटीएम वापरताना अधिक काळजी घेण्याचे आणि कोणत्याही अनोळखी व्यक्तीची मदत न घेण्याचे आवाहन पोलिसांकडून करण्यात येत आहे.

# परळमध्ये कलगी तुरा ब्रीदपूजन व गुरु-शिष्य सागरीत मांड सोहळा भक्तिभावात संपन्न

अक्षराज : उदय दणदणे

दि.३०,मुंबई : कोकणातील शाहिरी लोककलावंतांची मातृसंस्था म्हणून ओळखल्या जाणाऱ्या कलगी तुरा समाज उन्नती मंडळ, मुंबई*या संस्थेच्या वतीने सालाबादप्रमाणे नारळी पौर्णिमेच्या पावन पर्वावर ब्रीदपूजन व गुरु-शिष्य सागरीत मांड सोहळा मोठ्या उत्साहात आणि भक्तिभावाने संपन्न झाला. कोकणच्या कलगी तुरा शाहिरी परंपरेचा आत्मा असलेली शाहिरी ही केवळ कला नाही, तर तो एक संस्कार आहे. 'गुरु बिन ज्ञान नाही' या उक्तिप्रमाणे पूर्वजांनी दिलेला हा सांस्कृतिक ठेवा जतन करणे आणि गुरु-शिष्य परंपरेचा गौरवशाली वारसा पुढील पिढीकडे सोपविणे, या पवित्र उद्देशाने या सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. दिनांक २७ ऑगस्ट २०२६ रोजी कुणबी समाजोन्नती संघ, वाघे हॉल, परळ, मुंबई - १२ येथे हा सोहळा मंगलमय वातावरणात पार पडला. डफ, तुणतुणे, ढोलकी आणि टाळाच्या निनादात संपूर्ण सभागृह दुमदुमून गेले होते.

सोहळ्याची सुरुवात दीपप्रज्वलन व ब्रीदपूजनाने झाली. गुरुजनांनी आपल्या कृपाशीर्वादाने नव्या शिष्यांना शाहिरीची दीक्षा देऊन शाहिरी परंपरेचा पवित्र दिवा पुढील पिढीकडे सुपूर्द केला. मंडळाचे सरचिटणीस संतोष धारशे यांनी उपस्थितांचे स्वागत करून ब्रीदपूजन व सागरीत मांड या परंपरेचे आध्यात्मिक आणि सांस्कृतिक महत्त्व विषद केले.

कुणबी समाजोन्नती संघाचे सरचिटणीस कृष्णा वने, एकनाथ सुकुम,समीर रेवाळे, पत्रकार सुजित धाडवे,मि तेश नवले, चिठ्ठी मालक डॉ. सूर्यकांत चव्हाण, अशोक निंबरे,अनिल सावंत, पांडुरंग देवळेकर, रवींद्र मुकनाक, आनंद कुळये, मारुती चव्हाण, अप्पा फडकले, कृष्णा जोगळे, मधुकर पंदेरे, विकास लांबोरे,भिकाजी भुवड, विनोद फटकरे, सदानंद सरवंदे, प्रवीण कुळये, सुभाष चौधुले, शांताराम गोताड,मंगेश यादव, अनंत बावकर, हरी बावकर, शीरंग रहाटवळ, प्रकाश गोसावी, शाहीर उमेश वाजे, रुपेश साटले, भरत गाणेकर, देवजी मोंडे, रवींद्र नाचरे, नितीन रसाळ, नितीन मास्कर, संतोष कोलापटे, शरद कदम, शंकर मालप,मनोहर वाडकर, सुधाकर गोणबरे, नवनाथ बाटे, तसेच कलगी तुरा राजापूर मंडळाचे अध्यक्ष चंद्रकांत वालम बुवा आदी विविध क्षेत्रातील मान्यवर,शाहीर, कलाकार, चिठ्ठी म ालक व हितचिंतक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अध्यक्ष सुरेश ऐनारकर, उपाध्यक्ष सुरेश चिबडे, सरचिटणीस संतोष धारशे, सहसचिव सुधाकर मास्कर, सहसचिव दिलीप नामे, खजिनदार सत्यवान यादव, तसेच कार्यकारिणी सदस्य सुरेश कदम, अनंत तांबे, अनंत मुंगळे, दामोदर गोरीवले, दीपक म्हादये, विश्वनाथ रक्ते, निलेश जोगळे, संतोष पारदले, सचिन धूमक, चंद्रकांत धोपट, अनंत मांडवकर आणि उदय दणदणे यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाच्या शेवटी सहसचिव दिलीप नामे यांनी सर्व मान्यवर, शाहीर कलाकार व हितचिंतकांचे आभार म ानले. या कार्यक्रमाचे औचित्य साधून झालेल्या तात्काळ कार्यकारिणी बैठकीत 'कलगी तुरा वंशावळी ग्रंथ' प्रकाशित करण्याचा आणि कलगी तुरा कलाकारांच्या उन्नती व विकासासाठी एक महत्त्वपूर्ण उपक्रम हाती घेण्याचा ऐतिहासिक निर्णय घेण्यात आला. या उपक्रम ाची सविस्तर माहिती लवकरच जाहीर करण्यात येईल.

# प्रताप सरनाईक फाउंडेशन तर्फे व कै.कॅप्टन कौस्तुभ राणे स्मरणार्थ गणपती सजावट स्पर्धेचा भव्य बक्षीस वितरण सोहळा संपन्न

अक्षराज : घनश्याम आंबोकर

दि.३०, मिरा भाईंदर : प्रताप सरनाईक फाउंडेशनतर्फे आयोजित करण्यात आलेल्या सार्वजनिक व घरगुती गणपती उत्सव सजावट स्पर्धा २०२५ चा बक्षीस वितरण समारंभ तसेच कॅप्टन कै. कौस्तुभ राणे स्मरणार्थ कार्यक्रम नुकताच मिरा रोड येथील लता मंगेशकर नाट्यगृहात उत्साहात पार पडला.



या कार्यक्रमाला नागरिकांचा उत्स्फ ूर्त प्रतिसाद मिळाला. संपूर्ण नाट्यगृह प्रेक्षकांनी खचाखच भरले होते. सभागृहातील जागा अपुरी पडल्याने काही नागरिकांना बाजूला उभे राहून कार्यक्रम ाचा आनंद घ्यावा लागला.

कार्यक्रमादरम्यान नाट्यगृहातील वातानुकूलित यंत्रणा बंद असल्याचे निदर्शनास आल्यानंतर मंत्री प्रताप सरनाईक यांनी याबाबत खेद व्यक्त करत मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या व्यवस्थेवर नाराजी व्यक्त केली. तसेच नाट्यगृहातील सुविधा अधिक चांगल्या करण्यासाठी नागरिकांनीही सहकार्य करावे, असे आवाहन त्यांनी केले. प्रत्येक नागरिकाने १०० रुपयांचे योगदान डीडीद्वारे पाठवावे, अशी विनंती ही त्यांनी यावेळी केली.

सार्वजनिक गणपती मंडळांच्या सजावट स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या संस्थांना रोख पारितोषिकांसह मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. प्रथम क्रमांकास १ लाख रुपये, द्वितीय क्रमांकास ५१ हजार रुपये तर तृतीय क्रमांकास २५ हजार रुपये असे रोख पारितोषिक देण्यात आले. विविध शिवसेना पदाधिकाऱ्यांच्या हस्ते विजेत्या संस्थांचा सन्मान करण्यात आला.

याशिवाय घरगुती गणपती सजावट स्पर्धेत सहभागी झालेल्या ३०० हून अधिक स्पर्धकांना प्रत्येकी १० हजार रुपये रोख पारितोषिक व मानचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले.

कार्यक्रमाला नागरिक, गणेशभक्त, विविध गणेश मंडळांचे पदाधिकारी तसेच शिवसेनेचे पदाधिकारी राजू भोईर, सचिन मांजरेकर, निशा नार्वेकर, डॉ प्रीती पाटील, तावडे, दीप काकडे व मोठ्या संख्येने शिवसैनिक उपस्थित होते. उत्साहपूर्ण वातावरणात झालेल्या या सोहळ्यामुळे गणेशोत्सवाच्या सामाजिक व सांस्कृतिक परंपरेला आणखी चालना मिळाली.

# ३२ वीज कर्मचाऱ्यांचा महाराष्ट्र वीज कामगार महासंघात प्रवेश

अक्षराज : दिवाकर घेर

दि.३०, नागपूर : महाराष्ट्र वीज कामगार महासंघाचे नेतृत्व, तत्व, कार्यप्रणाली, ध्येय धोरणे, कामगारांना न्याय देण्याची धडपड यावर विश्वास करत औष्णिक वीज केंद्र खापरखेडा येथील ईतर संघटने मधून ३२ वीज कर्मचाऱ्यांनी कामगार महासंघाचे केंद्रीय अध्यक्ष विठ्ठल भालेराव यांचे उपस्थित महाराष्ट्र वीज कामगार महासंघात प्रवेश घेतला.

यात्प्रसंगी राजेंद्र केमेकर, निखिल घोडमारे, राजेश मेश्राम, राहुल शुक्ला, धनराज सावसाकडे, रुषिकेश कुळमेथे, अमित चौधरी, विशाल शेळके आदी मान्यवर प्रामुख्याने उपस्थित होते.

संघटनेत प्रवेश केलेल्या सर्व वीज कामगारांचे अध्यक्ष विठ्ठल भालेराव, उपाध्यक्ष (महानिर्मिती) विलास भालेराव, कोराडी/खापरखेडा झोन अध्यक्ष ज्ञानेश्वर चरपे, झोन सचिव निलेश चरखे, ज्येष्ठ नागरिक संघाचे बाबा नागपूरकर यांनी पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले.

यावेळी खापरखेडा शाखा अध्यक्ष डोमासिंग (जितु) नवधींगे, सचिव भुषण छानीकर, कोराडी शाखा अध्यक्ष नचिकेत आमटे, झोन उपाध्यक्ष धनंजय दानी, कोषाध्यक्ष संदिप नेहुलकर, कोराडी शाखा उपाध्यक्ष नितीन शर्मा, संघटनमंत्री रविंद्र नागपुरे, कोषाध्यक्ष जीवन ताजने, प्रसिद्धी प्रमुख स्वप्नील उघडे, कार्यालय मंत्री पंकज गोसावी, उपाध्यक्ष जयेंद्र डहाके, कोषाध्यक्ष मनोज सीरसे, प्रसिद्धी प्रमुख मुलचंद नवधिंगे, गणेश केलझरे, श्रीनिवास चाटे यांचे सह मोठ्या संख्येने सभासद आणि कार्यकर्ते उपस्थित होते. केंद्रीय अध्यक्ष विठ्ठल भालेराव यांनी



उपस्थितांना संघटनात्मक आणि चालु घडामोडी यावर सविस्तर मार्गदर्शन केले. कार्यकर्ता कसा असावा, काम करण्याची पद्धत, संघटन, संपर्क यावर विलास भालेराव उपाध्यक्ष महानिर्मिती यांनी म ार्गदर्शन केले.

या भव्य दिव्य प्रवेश सोहळा कार्यक्रमाचे संचालन आणि आभार निलेश चरखे यांनी केले. प्रवेश केलेल्या ३२ कार्यकर्त्यांमुळे खापरखेडा येथे म हाराष्ट्र वीज कामगार महासंघाची ताकद अजुन वाढल्याची भावना शाखा अध्यक्ष डोमासिंग ( जितु ) नवधिंगे यांनी व्यक्त केली. तसेच राजेंद्र केमेकर, निखिल घोडमारे, राजेश मेश्राम व ईतर सर्व सभासदांनी पुढील काळात खापरखेडा येथे सभासद संख्येत लक्षणीय वाढ होईल असे वरिष्ठ पदाधिकार्यांना आश्वासित केले.

## थोडक्यात बातम्या

# अण्णाभाऊ साठे हे थोर विचारवंत - किरण सूर्यवंशी

अक्षराज : जयराम देमगुंडे



दि.३०, उदगीर (लातूर) : उदगीर तालुक्यातील मौजे देवुळवाडी गावात लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या १०६ जयंतीनिमित्त कार्यक्रमात बोलताना हे केवळ साहित्यिक नव्हते, तर ते सम ाजाच्या वास्तवाचे भान असलेले थोर विचारवंत आणि परिवर्तनवादी लोकनेते होते, असे प्रतिपादन किरण सूर्यवंशी यांनी केले.

अण्णाभाऊ साठे यांच्या विचारांचा आणि साहित्याचा समाजमनावर मोठा प्रभाव आहे. त्यांनी आपल्या लेखणीच्या माध्यमातून वंचित, शोषित आणि कष्टकरी सम ाजाच्या व्यथा मांडत सामाजिक समतेचा संदेश दिला. त्यांच्या साहित्यामध्ये साम ान्य माणसाच्या संघर्षाचे वास्तववादी चित्रण दिसून येते. त्यामुळे आजच्या तरुण पिढीने अण्णाभाऊ साठे यांच्या विचारांचा अभ्यास करून सामाजिक परिवर्तनासाठी योगदान द्यावे, असे आवाहन सूर्यवंशी यांनी केले. कार्यक्रमात अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यिक व सामाजिक कार्यावर विविध मान्यवरांनी आपले विचार व्यक्त केले. उपस्थितांनी त्यांच्या प्रतिमेस अभिवादन करून त्यांच्या कार्याला आदरांजली वाहिली. अण्णाभाऊ साठे यांचे साहित् आणि विचार समाजाला प्रेरणा देणारे असून, त्यांचा समतेचा आणि मानवतेचा संदेश पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचवणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे, असेही यावेळी सांगण्यात आले.

# बिना (संगम) गावात बिबट्याचा धुमाकूळ; बिबट्याच्या हल्ल्यात गाय ठार

अक्षराज : दिवाकर घेर



दि.३०, खापरखेडा (नागपूर) : स्थानिक पोलीस स्टेशन हद्दीतील बिना(संगम)गावात मागील दोन दिवसांपासून बिबट्याने धुमाकूळ घातला आहे. बिबट्याच्या हल्ल्यात एक गाय ठार झाल्याची घटना ३० ऑगस्ट रविवारला सकाळच्या सुमारास उघडकीस आली आहे. ग्रामपंचायत मागील भागात बिबट्याचे ठसे आढळून आल्यामुळे बिनासंगम गावात दहशत पसरली असून कर्तव्यात कसूर करणाऱ्या कामठी वनपरिक्षेत्र विभागाच्या कार्यप्रणालीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. बिना(संगम) गाव राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या मतदार संघात आहे. ३० ऑगस्ट रविवारला सकाळच्या सुमारास बिना(संगम) गावातील प्रगतीशील शेतकरी विजय भडंग यांच्या शेतात गाईवर हल्ला करून बिबट्याने ठार केल्याची घटना उघडकीस आली तर घटनेच्या एक दिवसापूर्वी बिबट्याने ३ महिन्यांच्या गाईच्या वासरावर हल्ला करून ठार केले.सदर घटनेची माहिती कामठी व खापा वनपरिक्षेत्र विभागाला माहिती देण्यात आली. खापा वनपरिक्षेत्र विभागाचे कर्मचारी आशिष खोब्रागडे यांनी घटनास्थळ गाठून पंचनामा केला. म ात्र, कामठी वनपरिक्षेत्र विभागाच्या अधिकाऱ्यांनी तसदी दाखविली नाही त्यामुळे कामठी वनपरिक्षेत्र विभागातील अधिकारी कर्तव्यात किती तत्पर आहेत हे दिसून येते.या घटनेत विजय भडंग यांचे जवळपास ४० हजार रुपयांचे नुकसान झाले असून नुकसान भरपाईची मागणी करण्यात येत आहे. मागील अनेक दिवसांपासून शिंगोरी, सावली, भानेगाव, बिना(संगम) परिसरात बिबट्याचा वावर आहे. बिबट्याच्या हल्ल्यात जवळपास सहा जनावरे ठार झाली आहेत. मात्र, वनविभाग प्रशासन कुंभकर्णी झोपेत आहे. त्यामुळे दहशत निर्माण करणाऱ्या बिबट्याला जेरबंद करण्याची मागणी गावकऱ्यांनी केली आहे.

# लोकमान्य टिळक कन्या विद्यालय चंद्रपूर येथे राष्ट्रीय क्रीडा दिन साजरा



अक्षराज : वसंत वडस्कर

दि.३०, चंद्रपूर : लोकमान्य टिळक स्मारक मंडळ, चंद्रपूर द्वारा संचालित लोकमान्य टिळक कन्या विद्यालय चंद्रपूर येथे दि.२९ ऑगस्ट २०२६ रोजी खेळाचे जादूगार म्हणून ओळखले जाणारे महान हॉकीपटू मेजर ध्यानचंद यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रीय क्रीडा दिनाचे औचित्य साधून विद्यालयाच्या मुख्याध्यापिका प्रांजली महादाणी यांच्या हस्ते हॉकीपटू मेजर ध्यानचंद यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी क्रीडा शिक्षक कळसकर सर तसेच वसंत वडस्कर सर, अनिल पेटकर सर, चिमरालवार सर, पराग पुण्यप्रेड्डीवार, किरण कन्नोजवा, नंदूरकर मॅडम, भट मॅडम, जोशी मॅडम, कवाडे मॅडम, खडके मॅडम, यांची उपस्थिती होती. यात्प्रसंगी विद्यार्थिनींना मार्गदर्शन करताना मुख्याध्यापिका महादाणी मॅडम म्हणाल्या की, जर आपले शरीर सुदृढ असेल तर मन सुदृढ राहते. मानवी जीवनात खेळामुळे संघभावना, शिस्त, चिकाटी निर्माण होते. यावेळी रोज एक तास मैदानावर रहा, खेळासाठी वेळ द्या असे आवाहन ही विद्यार्थिनींना मॅडमनी केले. यानंतर विद्यार्थिनींसाठी क्रीडा संघ अंतर्गत खो-खो स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धेत पी टी उषा संघ विरुध्द कर्णम मल्लेश्वरी संघ यांच्यात सामना घेण्यात आला होता त्यात पी टी उषा संघ विजेता तर उपविजेता म्हणून कर्णम मल्लेश्वरी संघ ठरला. विजेत्या व उपविजेत्या संघाला लोकम ान्य टिळक स्मारक मंडळाचे सचिव गागेय सराफ यांनी बक्षिस व शिल्ड देऊन पुरस्कृत केले. यावेळी शाळेतील शिक्षक-शिक्षिका, शिक्षकेत्तर वृंद व बहुसंख्येने विद्यार्थीनी उपस्थित होत्या.

# कळमसरे विद्यालयात रंगला रक्षाबंधन सोहळा

अक्षराज : नंदकुमार बोरसे

दि.३०, शिरपूर (धुळे) : शिरपूर तालुक्यातील कळमसरे येथील आदर्श माध्यमिक विद्यालयात आनंददायी शनिवार कार्यक्रम अंतर्गत राष्ट्रीय क्रीडा दिवस व रक्षाबंधनाचे औचित्य साधून कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान विद्यालयातील ज्येष्ठ शिक्षिका वैशाली गौरव सोनवणे यांनी भूषवले तर प्रमुख अतिथी म्हणून सेवानिवृत्त क्रीडाशिक्षक ए.डी महाजन व मुख्याध्यापक आर जे सोनवणे तसेच विद्यालयातील सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. सर्वप्रथम राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त मेजर ध्यानचंद व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले व महात्मा ज्योतिबा फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. रक्षाबंधनाचे महत्त्व हर्षदा चौधरी यांनी सांगितले. तर राष्ट्रीय क्रीडादिनाचे महत्त्व सेवानिवृत्त क्रीडा शिक्षक ए डी महाजन यांनी सांगितले. यानिमित्त विद्यार्थिनींनी साडी डे साजरा केला. शेवटी वर्ग प्रतिनिधींचा संगीत खुर्चीचा कार्यक्रम घेऊन कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी नेहा चौधरी, रेणुका वाडीले, महाले मॅडम, रोहिदास पावरा, रमेश माळी, निलेश गिरासे व सर्व वर्गाच्या विद्यार्थी प्रतिनिधींनी सहकार्य केले.